॥ नाहीं कशी म्हणूं तुला ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः आरती प्रभू
संगीतः हृदयनाथ मंगेशकर

नाहीं कशी म्हणूं तुला, म्हणतें रे गीत;
परी सारें हलक्यानेंः आड येते रीत ॥ १ ॥

नाहीं कशी म्हणूं तुला ... येतें जरा थांब;
परी हिरव्या वळणांनी जायचे न लांब ॥ २ ॥

नाहीं कशी म्हणूं तुला, माळ मला वेणी;
परी नीट, ओघळेल, हांसतील कोणी ॥ ३ ॥

नाहीं कशी म्हणूं तुला, घेतें तुझें नांव;
परी नको अधरांचा मोडूं सुमडाव ॥ ४ ॥

नाहीं कशी म्हणूं तुला, जरा लपूंछपूं;
परी पायां खडेकांटे लागतात खुपूं ॥ ५ ॥

नाहीं कशी म्हणूं तुला, विडा रे दुपारीं;
परी थोरांच्या समोर घ्यायची सुपरी ॥ ६ ॥